दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २४० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२५ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# राज्यातील १०५ नगरपंचायतींसाठी २१ डिसेंबरला मतदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील विविध ३२ जिल्ह्यांतील १०५ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी येत्या २१ डिसेंबर रोजी मतदान तर; २२ डिसेंबर रोजी मतमोजणी होईल. त्यासाठी संबंधित नगरपंचायतींच्या क्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज येथे केली.

मदान यांनी सांगितले की, राज्यातील एप्रिल २०२० ते मे २०२१ या कालावधीत मुदत संपलेल्या ८१ आणि डिसेंबर २०२१ मध्ये मुदत संपणाऱ्या १८; तसेच नवनिर्मित ६ अशा एकूण १०५ नगरपंचायतींच्या प्रत्येकी १७ सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होईल. त्यासाठी १ ते ७ डिसेंबर या कालावधीत नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील. ४ व ५ डिसेंबर रोजी सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी ८ डिसेंबर रोजी होईल. मतदान २१ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३०



पर्यंत असेल. २२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरू होईल.

कोकण विभागातील ठाणे- मुरबाड व शहापूर, पालघर- तलासरी, विक्रमगड, मोखाडा, रायगड- खालापूर, तळा, माणगाव, म्हसळा, पोलादपूर, पाली (नवनिर्मित), रत्नागिरी- मंडणगड, दापोली, सिंधुदुर्ग- कसई-दोडामार्ग, वाभवे-वैभववाडी, कुडाळ या नगरपंचायतीच्या निवडणुका होत आहेत.

राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्याचबरोबर कोविड-१९ संदर्भात केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार व आवश्यक त्या उपाययोजना करून या निवडणुकांचा कार्यक्रम राबवावा. त्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी, असेही निर्देश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, अशी माहितीही मदान यांनी दिली.

# एस.टी. कर्मचाऱ्यांना ऐतिहासिक पगारवाढ

## सरकारची घोषणा, संप मागे घेण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या १५ दिवसांपासून सुरु असलेला एसटी कर्मचाऱ्यांचा संप मागे घेण्याबाबत सरकारने एक पाऊल पुढे टाकलं आहे. परिवहन मंत्री अनिल परब यांच्यासह एसटी कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाची बैठक झाली. या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीच्या निर्णयावर तुर्तास संप मागे घ्यावा असं आवाहन सरकारकडून करण्यात आले आहे. परिवहन मंत्री अनिल परब यांच्यासह शिष्टमंडळाच्या संयुक्त पत्रकार परिषदेत एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीची घोषणा करण्यात आली आहे.

पत्रकार परिषदेत अनिल परब म्हणाले की, एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरु होता. त्यातील प्रमुख मागणी विलिनीकरणाची होती. यावर सरकारची भूमिका स्पष्ट होती. हा विषय उच्च न्यायालयात गेला असून त्यावर त्रिसदस्यीय कमिटी बनवली. १२ आठवड्याच्या आत या कमिटीचा रिपोर्ट येईल. विलिनीकरणाबाबत कर्मचाऱ्यांचे जे म्हणणं आहे ते कमिटीसमोर मांडावा असा कोर्टाचा आदेश आहे. त्यामुळे कामगारांची विलिनीकरणाची मागणी कोर्टात न्यायप्रविष्ट आहे.





कमिटीचा जो काही निर्णय येईल तो मान्य करू अशी शासनाची भूमिका आहे. विलिनीकरणाबाबत न्यायप्रविष्ट बाब असल्याने तिढा निर्माण झाला. संपामुळे राज्यातील ग्रामीण जनतेची, शाळेय विद्यार्थ्यांची अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे संपावर मध्य मार्ग काय काढायचा यावर सरकार प्रयत्नशील होतं असं त्यांनी सांगितले.

तसेच संपावर तोडगा काढण्यासाठी कर्मचाऱ्यांचा पगारवाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या मूळ पगारात ही वाढ करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यातील कर्मचाऱ्यांना ७ हजार २०० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. ४१ टक्क्यांनी ही वाढ दिली आहे. एसटीच्या इतिहासातील सर्वात मोठी पगारवाढ आहे. १ ते १० वर्ष सेवा बजावलेल्या कर्मचाऱ्यांच्या पगारात ५ हजारांची वाढ झाली आहे. १० ते २० वर्षाच्या सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारात ४ हजार पगारवाढ करण्यात आली आहे अशी माहिती परिवहन मंत्री अनिल परब यांनी दिली आहे.

राज्य सरकारने एसटी महामंडळाला २७०० कोटी रुपये पगारासाठी दिले होते. कोरोना काळात काही कारणास्तव कर्मचाऱ्यांचे पगार उशीरा होत होते. त्यामुळे यापुढे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेआधी एसटी कर्मचाऱ्यांचा पगार होईल अशी हमी परिवहन मंत्री अनिल परब यांनी दिली आहे. कामगारांचे उत्पन्न वाढवण्यासाठी Intensive कर्मचाऱ्यांना देणार आहे. एसटी महामंडळाचं उत्पन्न वाढवलं तर त्या चालक-वाहक कर्मचाऱ्यांना पगाराशिवाय ही रक्कम दिली जाईल.

ज्या कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केली त्यांच्या कुटुंबाबद्दल शासन सहानुभुतीनं विचार करेल असंही अनिल परब म्हणाले.

# अपहरण केलेल्या मुलाची अवघ्या ४ तासाच्या आत सुटका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका ६ वर्षीय मुलाची त्याच्याच नात्यातील माणसांनी लग्नाला विरोध केला म्हणून अपहरण केले होते. परंतु खांदेश्वर पोलिसांनी अवघ्या ४ तासात सदर मुलाला मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन येथून ताब्यात घेवून अपहरणकर्त्यांकडून त्याची सुटका केली आहे. यावेळी त्या मुलाच्या आई वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले होते.

तक्रारदार विनय गामा सिंग, वय ३९ वर्षे, रा. विचूंबे, यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिली की, त्यांची पत्नी सौ. पिंकी सिंग यांचे मोबाईलवर अज्ञात इसमाने सायंकाळी फोन करून व एसएमएसव्दारे धमकी दिली की, त्यांचा मुलगा यश, वय ६ वर्षे (नाव बदललेले आहे.) हा व त्यांची भाची महिला (२१) हे आमच्या ताब्यात असून दहा लाख रूपये घेवून मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथे या, अन्यथा दोघांनाही ठार करू. तक्रारदार या दिलेल्या तकारीवरुन खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस आयुक्त, नवी मुंबई, बिपिनकुमार सिंह,

.../२



## संक्षिप्त...

### ममता बॅनर्जी उद्धव ठाकरे, शरद पवारांची घेणार भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आहे. जवळपास ३० मिनिटं या दोन्ही नेत्यांमध्ये बैठक झाली. यात ममता बॅनर्जी यांनी नैसर्गिक आपत्तीनंतर नुकसान भरपाई आणि सीमा सुरक्षा दलानं राज्यात दखल या मुद्द्यावर चर्चा केली. ममता बॅनर्जी सोमवारी दिल्लीत पोहचल्या होत्या.

ममता बॅनर्जी म्हणाल्या की, इड्ऋ ला जास्त ताकद दिल्यास त्याचा राज्यातील कायदा सुव्यवस्थेवर परिणाम होईल. कायदा सुव्यवस्था राखणं ही जबाबदारी राज्याची आहे. कूचबिहारमध्ये बीएसएफनं अंधाधुंद गोळीबार केला. बीएसएफशी निगडीत अनेक घटना बंगालच्या सीमावर्ती भागात घडतात. त्यासाठी राज्य सरकारच्या संघराज्य पद्धतीत कुठलीही अडचण नको यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत चर्चा झाली अशी माहिती त्यांनी दिली.

या बैठकीत ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारकडून अद्याप ९६ हजार ५०६ कोटी रुपये नैसर्गिक संकटानंतर जाहीर केलेल्या मदतीची रक्कम पोहचली नसल्याचं सांगितले. त्रिपुरा येथील हिंसाचाराच्या घटनेवरही पंतप्रधान मोदींशी चर्चा झाली. टीएमसी कार्यकर्ता शायनी घोष यांना टार्गेट केले गेले. त्यांची अटक झाली याची माहितीही बैठकीत देण्यात आली. त्याचसोबत पश्चिम बंगालमध्ये २० ते २१ एप्रिल २०२२ मध्ये होणाऱ्या बिझनेस मीटचं आमंत्रण मोदींना देण्यात आले. पंतप्रधानांसोबत बैठकीआधी ममता बॅनर्जी यांनी सुब्रह्मण्यम स्वामी यांची भेट घेतली.

# माणगावजवळ गावठी हातबॉम्बच्या स्फोटात एकाचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । माणगाव**

तालुक्यातील निजामपूरजवळ गावठी हातबॉम्बचा स्फोट होऊन एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक १० वर्षीय मुलगा गंभीर असून महिला किरकोळ जखमी झाली आहे. घटनास्थळी २५ हातबॉम्ब सापडले आहेत. निजामपूर विभागातील चन्नाट रस्त्यावर मशीदवाडी गावच्या हद्दीत जनार्दन लक्ष्मण कदम यांच्या माळरानात नदीजवळ घटना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची फिर्याद चिंतामण पुंडलिक कदम पोलीस पाटील शिरसाट यांनी माणगाव पोलिसांना दिली.

मयत संदेश आदिवासी चौहान (वय - ४५), त्यांची पत्नी मजिनाबाई संदेश चौहान (वय -४०), मुलगा सत्यम संदेश चौहान(वय -१०) सर्व रा. सुरजासिंह ४० गाव बिराहली ता.रिथी जि.कठनी, राज्य मध्यप्रदेश हे माणगाव तालुक्यातील मशीदवाडी गावच्या हद्दीत



धामणी नदी शेजारी शेतातील माळरा- नात उघड्यावर राहत होते. सदरच्या हातबॉम्ब हे डुक्कर व मासे मारण्यासाठी अनधिकृतपणे आणले होते.

संदेश चौहान हा हात बॉम्ब हाताळत असताना त्या बॉम्बचा अचानक स्फोट झाला. त्यामध्ये संदेश यांचा जागीच मृत्यू झाला. तर मुलगा सत्यम यास गंभीर दुखापत होऊन त्याची पत्नी माजीनाबाई हिला

.../२

# वडाळे तलावा संदर्भात केलेल्या सूचनांचा प्रितम म्हात्रे यांनी घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काही दिवसांपूर्वी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी वडाळे तलाव येथील सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला होता त्यावेळी तेथे सुरू असलेल्या कामातील निकृष्ट दर्जा बद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली होती आणि त्या दुरुस्त करण्याच्या सूचना केल्या होत्या त्या केलेल्या सूचनांचा आढावा घेण्यासाठी आज विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे ,नगरसेविका सौ प्रीती जॉर्ज यांनी भेट दिली. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे अभियंता संजय कटेकर आणि गावडे उपस्थित होते.

यावेळी तिथे सफाई नसल्यामुळे सदर ठिकाणी दिवसातून दोन वेळा स्वच्छता करण्यात यावी असे सांगितले. काही ठिकाणी ट्रॅकवर साचलेले पाणी निघण्यासाठी पाण्याचे पाईप जमिनीपासून दोन इंच वर आहेत ही गोष्ट अभियंता यांच्या निदर्शनास आणली. सदर ठिकाणी नागरिकांचा वावर सुरू झाल्यामुळे त्या ठिकाणी लवकरात लवकर कचरा कुंडी बसवण्यात यावी असे सुचविले. बर्याच ठिकाणी भरलेल्या सांध्यांना क्रॅक आलेले आहे. काही दिवसांनी ते उन्हाच्या तडाख्याने निघणार त्यामुळे ते योग्य रीतीने भरण्यात यावे याची दक्षता घेण्यास सांगितले. तलावाच्या सभोवताली ट्रॅकवर सीसीटीव्ही ची आवश्यकता आहे ते लवकरात लवकर बसवण्यात यावे. चालण्याच्या ट्रॅकवर कुत्रे आणि सायकली तसेच वाढदिवस साजरे करणार्या नागरिकांचे प्रमाण वाढले आहे त्यांना कुठेतरी आळा घालण्यात यावा अशी मागणी तेथे उपस्थित असणारे ज्येष्ठ नागरिक आणि नागरिकांकडून करण्यात आली. त्यासंदर्भात श्री.प्रीतम म्हात्रे यांनी पनवेल महानगरपालिकेने ठीकठिकाणी नियमावलीचे सूचना फलक लावावे ज्यामध्ये ट्रॅकवर सायकलने आणू नये, कुत्रे आणू नये ,वाढदिवस साजरे करू नये , फटाके फोडू नये अशा प्रकारच्या ठराविक सूचना असतील .

तसेच सदर विभागातील स्वच्छता अधिकारी आणि

.../२



# राजपत्रित अधिकारी महासंघ समन्वय समितीच्या अध्यक्षपदी डॉ.गणेश मुळे

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कोकण भवन समन्वय समितीच्या अध्यक्षपदी माहिती व जनसंपर्क विभागाचे कोकण विभागीय उपसंचालक डॉ.गणेश व. मुळे यांची निवड झाल्याची घोषणा महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई यांनी आज येथे केली.

राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार ग.दि.कुलथे यांच्या अध्यक्षतेखाली कोकण भवनात झालेल्या बैठकीत सन २०२१-२०२३ या वर्षासाठीच्या कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यामध्ये कार्याध्यक्षपदी राज्यकर विभागाचे उपायुक्त कमलेश दि.नागरे, सचिवपदी सार्वजनिक आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.गणेश धुमाळ, खजिनदारपदी राज्यकर विभागाचे सहायक आयुक्त सुबोध लवटे, उपाध्यक्षपदी सिडकोचे उपजिल्हाधिकारी संदीप माने, लेखा



व कोषागारे सहसंचालक अनुदीप दिघे, दक्षता व गुण नियंत्रण मंडळाचे अधीक्षक अभियंता ए.एस.टोपले, अधीक्षक अभियंता एस.जी. शेलार यांची निवड करण्यात आली आहे.

तसेच महिला उपाध्यक्षपदी प्रादेशिक समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, राज्यकर विभागाच्या उपायुक्त माधवी सुर्यवंशी, लेखा व कोषागारे विभागाच्या सहायक संचालक रजनी केळकर, उपसचिवपदी सहकार विभागाचे उपनिबंधक शिरीष कुलकर्णी, तहसिलदार दयालसिंग ठाकूर, नायब तहसिलदार माधुरी डोंगरे, प्रादेशिक समाज कल्याण विभागाच्या सहायक संचालक मिनाक्षी वैद्य, सहखजिनदार राज्यकर विभागाचे सहायक आयुक्त शरदचंद्र पोहोनकर, जनसंवाद सचिवपदी भाषा संचालनालयाचे विभागीय भाषा सहायक योगेश शेट्ये, माहिती व जनसंपर्क विभागाचे

.../२

# नागोठणे जवळील महापारेषणच्या विद्युत उपकेंद्रात अग्नितांडव

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील कानसई(ता.रोहा) येथील ४०० केव्ही क्षमता असलेल्या विद्युत उपकेंद्रातील ट्रान्सफॉर्मरचा स्फोट झाल्यामुळे भीषण आग लागली. यावेळी ट्रान्सफॉर्मरमध्ये असणाऱ्या ऑईलमुळे आगीने येवढे भंयकर रौद्र रुप धारण केल्याने उपकेंद्रात अग्नितांडव पाहवयास मिळाला. यामुळे यावेळी अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांना आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावे लागले. ही घटना मंगळवारी( दि.२३) रोजी रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. या आगीत उपकेंद्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.



याबाबतीत स्थानिक रहिवाशांकडून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार नागोठणे जवळील कानसई येथील महापारेषणच्या ४०० केव्ही सबस्टेशनमध्ये मंगळवारी अचानक रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास ट्रान्सफॉर्मरचा स्फोट होऊन भीषण आग लागली. या अचानक झालेल्या

.../२

### खेलो इंडिया यूथ गेम्स जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांना सुरुवात

# खेळामध्ये प्रामाणिकपणे कष्ट घेतल्यास यश नक्की मिळते : ललिता बाबर



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या वतीने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, पनवेल येथे करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यातील १८ वर्षाखालील मुलांच्या एकूण १६ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय धावपटू तथा प्रांताधिकारी उरण श्रीमती ललिता बाबर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी श्रीमती ललिता बाबर यांनी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन केले. खेळाडूंनी आपल्या खेळांमध्ये प्रामाणिक कष्ट घ्यावे तसेच खेळांमधील जय-पराजय हे खिलाडू वृत्तीने स्वीकारावेत. पराजित झालेल्या खेळाडूंनी निराश न होता पुन्हा नव्या जोमाने पुढील स्पर्धेची तरी करून अधिकाधिक यश संपादन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, त्यांनी उपस्थित खेळाडूंना सांगितले. त्याचबरोबर उपस्थित तसेच जिल्ह्यातील सर्व खेळाडू युवक- युवती ज्यांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत, त्यांनी मतदार नाव नोंदणी मोहिमेत सहभाग घेऊन मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदवून भारतीय लोकशाही अधिक भक्कम करावी,असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.रविंद्र नाईक, शिवछत्रपती पुरस्कार विजेते तसेच या निवड समिती सदस्य श्री. सूर्यकांत ठाकूर,श्री. संजय कडू, कर्नाळा स्पोर्टस कॅडमीचे अध्यक्ष श्री.मुकुंद म्हात्रे, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे श्री. जनार्दन पाटील, प्रो-कबड्डी स्पर्धेचे पंच श्री. सुहास पाटील, कबड्डी असोसिएशनचे पंच, तांत्रिक अधिकारी, क्रीडा शिक्षक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांचे क्रीडा अधिकारी श्री. सचिन निकम, क्रीडा मार्गदर्शक श्रीम. मनिषा मानकर तसेच श्री. समीर रेवाळे यांनी स्वागत केले. यावेळी श्री.रविंद्र नाईक यांनी उपस्थित मान्यवरांना क्रीडा कार्यालयाच्या वतीने क्रीडा विभाग व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव लो-गो असलेल्या मास्कचे वाटप केले. प्रदर्शनीय सामन्यादरम्यान श्रीमती ललिता बाबर तसेच इतर मान्यवरांनी खेळाडूंचा परिचय करून घेतला व त्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथील अधिकारी कर्मचारी तसेच रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पंच व इतर पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. गुरुवार, दि.२५ रोजी १८ वर्षाखालील मुलींच्या गटातील सामने होणार आहेत, असे जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक यांनी कळविले आहे.

# रत्नेश्वरी देवीच्या मंदिराच्या संरक्षणासाठी हजारो ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जसखार गावाचे जागृत देवस्थान असलेल्या रत्नेश्वरी देवीच्या मंदिराच्या संरक्षणासाठी दिनांक २३/११/२०२१ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता प्राथमिक बैठक रत्नेश्वरी मंदिर जसखार -उरण तालुका येथे घेण्यात आली. बैठकीसाठी जसखार गावातील आणि आजू बाजूच्या गावातील हजारो नागरिकांनी उपस्थित राहून सहभाग दाखवला. मंदिराच्या अगदी जवळून जाणाऱ्या ब्रीज मुळे मंदिराचे सौंदर्य धुळीला मिळाले असून त्या ब्रीज साठी खोदण्यात आलेल्या पायलिंग मुळे मनिराच्या मुख्य पिलर आणि बिमना तडे गेलेले असून भिंतीचे देखील खुप नुकसान झालेले आहे.



ग्रामपंचायत जसखार, जेएनपीटी, सिडको, NHAI यांना अनेक वेळा पत्र व्यवहार करूनही कोणत्याही प्रकारचे उत्तर मिळाले नसून अनागोंदी कारभार सुरू आहे. उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते तथा उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार यांना जसखार मधील तरुणांनी मार्गदर्शनासाठी बोलावले होते. दोघांनीही मंदिराची पाहणी करून झालेल्या दुरावस्थेवर चिंता व्यक्त केली. जर ह्या ब्रीज चे काम त्वरित थांबविले नाही आणि त्याचा मार्ग मंदिराच्या दुरून नेला नाही तर भविष्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.अमित ठाकूर यांनी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला की रत्नेश्वरी देवीने जसखार गावाचे संरक्षण वर्षानुवर्ष केलेले आहे. आता त्याच्या मंदिराच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आली आहे. म्हणून सर्वांनी जागृत राहून उरण सामाजिक संस्थेच्या मार्गदर्शनाखाली जी काही आंदोलनाची दिशा ठरवली जाईल त्यात मोठ्यात मोठ्या संख्येने हजर राहावे असे आवाहन करण्यात आले. प्रा राजेंद्र मढवी यांनी सर्वांचे आभार मानले.

# जासई येथील शिवस्मारक जनतेसाठी खुले करावे : महेंद्र घरत



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे 'शिवस्मारक' रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध असून जासई येथील शिवस्मारक जनतेसाठी लवकरात लवकर खुले व्हावे यासाठी जिल्हा काँग्रेस चे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी जे. एन.पी.टी प्रशासनाकडे मागणी केली आहे.

या संदर्भाचे निवेदन घेऊन जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, उरण विधानसभा प्रभारी अखलाक शिलोत्री, फिशर मॅन काँग्रेस महाराष्ट्र उपाध्यक्ष मार्तंड नाखवा यांच्या शिष्ठमंडळाने आज जे. एन.पी.टी चे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांची भेट घेऊन त्यांना या बद्दल चे निवेदन दिले. उन्मेष वाघ यांनी सदर मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन सदरचे शिवस्मारक येत्या १ डिसेंबर २०२१ पासून जनतेसाठी खुले करण्याचे आश्वाशित केले आहे. जे.एन.पी.टी चेअरमन संजय सेठी यांनाहि या बाबतचे निवेदन दिले असुन त्यांचे स्वीयसहाय्यक पद्मनाभान यांच्या कडे निवेदन देण्यात आले आहे. त्यांनीही याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिले आहे. यावेळी काँग्रेस शिष्ठमंडळाने जे. एन.पी.टी प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानले. आता १ डिसेंबर पासून शिवस्मारक सर्वांसाठी खुले होणार असल्याने दास भक्तांमध्ये, शिव भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# कोरोनाने मृत्यू झालेल्या वडगाव येथील कामगाराच्या कुटुंबाला शासनाकडून ५० लाखाची मदत

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मागील दोन वर्षांपासून कोरोना महामारीच्या संकटात सर्वसामान्य जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा जीवाची पर्वा न करता कामाला लागली होती. या दरम्यान यातील अधिकारी वर्गासह कामगार कर्मचारी ही कोरोना बाधित होऊन मृत्यू झाले होते. त्यामुळे शासनाने या युद्धपातळीवर कार्यरत असणाऱ्या शासकीय घटकांना ५० लाखाची मदत जाहीर करण्यात आली होती. मात्र त्याची अंमलबजावणी तात्काळ व्हावी यासाठी स्थानिक स्तरावर प्रयत्न केले जात होते. खालापूर तालुक्यात वडगाव ग्रामपंचायतीचे घंटागाडी वरील चालक कामगार मारुती तुकाराम पारींगे यांना पहिल्या लाटेतच सेवा करीत असताना कोरोनाने गाठले आणि त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे त्याच्या कुटुंबाना मदत मिळावी यासाठी शासनाकडे खालापूर तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटना यांच्या मार्फत प्रस्ताव सादर करून पाठपुरावा केल्याने त्याच्या कुटुंबाना ५० लाखाची मदत त्याची पत्नी च्या खात्यावर जमा झाल्याने संघटने पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

शासनाची जाहीर झालेली मदत मिळावी यासाठी महाराष्ट्र राज्य ग्राम पंचायत संघटना संलग्न असणाऱ्या खालापूर तालुका ग्रामपंचायत संघटनेने पारिंगे यांचा मदतीचा प्रस्ताव सादर केला आणि त्याचा पाठपुरावा करण्यासाठी रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटना जिल्हा अध्यक्ष मंगेश म्हात्रे सचिव तांडेल काका, गोविंद म्हात्रे, अरूण देसाई यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच याकरिता रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.) व त्यांचा सर्व अधिकारी वर्ग, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व त्यांचा सर्व अधिकारी वर्ग आणि खालापूर तालुका पंचायत समितीचे मा.गटविकास अधिकारी व त्यांचे सर्व सहकारी अधिकारी वर्ग आणि वडगाव ग्रामपंचायतीचे सरपंच गाडगे ग्रामविकास अधिकारी यांनी मोलाची मदत केल्याने खालापूर तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेला पारींगे यांच्या कुटुंबाला शासनाची ५० लाख रुपायची मदत त्याच्या पत्नीच्या नावावर करण्यात यश मिळाले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## अपहरण केलेल्या मुलाची अवघ्या ४ तासाच्या आत सुटका

पोलीस सह आयुक्त, डॉ. जय जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सुरेश मेंगडे. पोलीस आयुक्त परिमंडळ २, पनवेल शिवराज पाटील व सहा. पोलीस आयुक्त, भागवत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली देवीदास सोनवणे, पोलीस निरीक्षक, गुन्हे, डी. डी. ढाकणे, सहा. पोलीस निरीक्षक, प्रविण पांडे, पो.उप निरी. निलेश पोळ, किरण वाघ, पो.हवा./सुदर्शन सारंग, महेश कांबळे, पो.ना./विशाल घोसाळकर, चेतन घोरपडे, पो.शि./सचिन सरगर, संभाजी गाडे, पनवेल शहर पोलीस ठाणेचे स.पो.निरी. दळवी व पथक, तळोजा पो.ठाणेचे स.पो.निरी. रोकडे, जाधव व पथक, कळंबोली पो. ठाण्याचे पो.उपनिरी. बच्छाव व पथक, गुन्हे शाखा युनिट २ चे पो.उपनिरी. वैभव रोंगे पोना/प्रविण पाटील व पथक अधिक शोध घेत असताना मोबाईल फोनद्वारे तांत्रिक तपास व सीसीटीव्ही फुटेज याचा आधार घेवून ती सर्व पथके बांद्रा टर्मिनल येथे रवाना झाली. यावेळी सखोल तपास केला असता त्यांनी आरोपी विपीन हिरालाल अग्रहरी (२१) याला ताब्यात घेतले व सदर मुलाची माहिती विचारली असता त्यांनी सदर मुलगा व त्याच्या सोबत असलेली महिला पुढे आली असता पोलीस पथक सुद्धा चक्रावून गेले. कारण विपीन अग्रहरी यानेच सहा महिन्यापूर्वी जिच्या बरोबर लग्न केले होते तीनेच आपल्या मामाच्या मुलाचे अपहरण केले होते. अधिक चौकशीमध्ये त्या दोघांच्या लग्नाला मामाचा विरोध होता. यामुळे मामाला धडा शिकविण्यासाठी त्यांनी मामाच्या मुलाचे अपहरण करून त्यांच्याकडे १० लाख रुपयाची खंडणी मागितली होती. पोलिसांना थोडा तरी वेळ झाला असता तर ते दोघेजण या मुलाला घेवून उत्तरप्रदेशला पळून जाणार होते. या कट त्यांनी उत्तरप्रदेशला सुल्तानपुर येथे रचला होता. त्यानुसार सदर तरुणी ही मामाकडे राहण्यास आली होती व त्यानंतर त्या दोघांनी सुनियोजितपणे या भाचाला घेवून ते पळून जाणार होते. परंतु पोलिसांच्या दक्षतेमुळे व सखोल तपासामुळे यांचा कट उघडकीस आला. याकामी रेल्वे पोलिसांची सुद्धा महत्वाची भूमिका राहिली आहे.

## माणगावजवळ गावठी हातबॉम्बच्या स्फोटात एकाचा जागीच मृत्यू

किरकोळ दुखापत झाली. घटनेतील गंभीर जखमी झालेल्या मुलाला तात्काळ माणगाव उपजिल्हा रुग्णालय याठिकाणी औषधोपचाराकरिता आणण्यात आले. याठिकाणी त्याच्यावर प्राथमिक औषधोपचार केल्यावर त्याची गंभीर परिस्थिती पाहून त्यास अधिक औषधोपचारासाठी एमजीएम रुग्णालय पनवेल येथे हलविण्यात आले आहे.

या घटनेची माहिती मिळताच रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक अशोक दुधे यांनीही माणगाव उपजिल्हा रुग्णालयात भेट दिली. तर रायगड जिल्हा अप्पर पोलिस अधीक्षक अतुल झेंडे, माणगाव तालुक्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रवीण पाटील व पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांनी त्वरित आपल्या सहकार्यांसमवेत घटनास्थळाला भेट दिली. सदर घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात येवून आरोपी संदेश आदिवासी चौहान, मजिनाबाई संदेश चौहान या आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा अधिक तपास माणगाव पोलिस करीत आहेत.

## वडाळे तलावा संदर्भात केलेल्या सूचनांचा प्रितम म्हात्रे यांनी घेतला आढावा

महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांचा संपर्क क्रमांक असावा जेणेकरून नागरिकांना तक्रार करण्यास सहकार्य होईल असे संबंधित अधिकार्यांना सुचवले आणि येत्या काही दिवसात बोर्ड लावण्यात यावे असे सांगितले. त्या ठिकाणी पोलीस आणि सुरक्षारक्षकांसाठी उंचीवर असलेल्या मचान स्वरूपी पेट्रोलिंग केबिन असावी जेणेकरून त्या ठिकाणी उभे राहून संपूर्ण तलाव परिसर पाहता येईल. तलावाच्या संपूर्ण परिसरात तिथे २४ तास सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे जेणेकरून काही रात्रीच्या वेळेस चुकीचा घटना घडतात त्या घडणार नाहीत. चालण्याच्या ट्रॅक वर काम नवीन असतानाच बर्याच ठिकाणी तडे गेलेत. कॉन्ट्रॅक्टरने ते वरच्यावर सिमेंट टाकून भरलेले आहेत कॉलिटी मेंटेन न केल्यामुळे पुढील वर्षी सुद्धा आहेच होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे ते पहिले करून घ्यावे असे त्यांनी सांगितले. तेथे येणार्या नागरिकांसाठी सबंध परिसरात कुठेही निवारा शेड नाही नागरिकांना बसण्यासाठी ठीक-ठिकाणी हँगिंग प्रकारच्या शेड्स असाव्यात जेणेकरून चालताना नागरिकांना त्याचा अडथळा होणार नाही असे सुचविले. यावेळी त्यांच्यासोबत पालिका अधिकारी संजय कटेकर, सुधीर साळुंके, गावडे, मा.नगरसेवक डी.पी.म्हात्रे, शेकाप नेते गणेश म्हात्रे, जॉनी जॉर्ज, माझे सहकारी नरेश मुंढे, मंगेश भोईर, मंगेश अपराज, सुरज बहाडकर, सुजित गुळवे, दर्शन कर्डीले, रोहित मोरे, प्रशांत मोरे, रोहन गावंड, संदेश मोहन, वैभव जोशी यावेळी उपस्थित होते.

## राजपत्रित अधिकारी महासंघ समन्वय समितीच्या अध्यक्षपदी डॉ.गणेश मुळे

कोकण विभागीय सहायक संचालक नंदकुमार वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे.

या कार्यकारणीतील कार्यकारी सदस्य म्हणून प्रादेशिक दुग्धव्यवसाय विभागाचे विकास अधिकारी एच.जी.गाडवे, राज्य माहिती आयोगाच्या उपसचिव रीना फणसेकर, सा.बां.विभागाचे अधीक्षक अभियंता संजय बोंगे, मुंबई विभागाच्या सहायक ग्रंथालय संचालक, शालिनी इंगोले, मागासवर्गीय कक्षाचे सहा.आयुक्त विनोद खिरोळकर, अप्पर कोषागार अधिकारी, सुर्यकांत वेजरे, ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त वासुदेव पाटील, रेखा पाटकरी हे असणार आहेत. तसेच या कार्यकारीणीला कोकण विभागाचे उपायुक्त (महसूल) मकरंद देशमुख, उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे, उपायुक्त (पुरवठा) विवेक गायकवाड, उपायुक्त (विकास) गिरीश भालेराव, स्थानिक निधी लेखा संचालनालयाचे संचालक महादेव नागरगोजे, राष्ट्रीय महामार्ग मंडळाच्या अधीक्षक अभियंता सु.नि.गायकवाड, सहकार विभागाचे विभागीय सहनिबंधक आप्पाराव घोलकर, ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष भरत बाष्टेवाड, राज्यकर विभागाचे सहआयुक्त रमेश जैद, नगररचनाचे सहसंचालक जि.ल.भोपळे यांचे मार्गदर्शन असणार आहे. या बैठकीस कोकण भवनमधील सर्व विभागांचे राजपत्रित अधिकारी उपस्थित होते.

## नागोठणे जवळील महापारेषणच्या विद्युत उपकेंद्रात अग्नितांडव

स्फोटाच्या भंयकर आवाजामुळे आजुबाजुच्या परिसरामध्ये मोठी घबराहट पसरली होती. सर्व परिसरामध्ये धुराचे लोटच्या लोट मोठ्या प्रमाणात दिसत होते. या आगीचे वृत्त समजताच ऐनघर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच मनोहर सुटे, राष्ट्रवादीचे युवा नेते निवास पवार यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. याच बरोबर या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नागोठणे पोलिस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्यासह पोलिस उपनिरिक्षक स्वप्निल सांवत-देसाई, पो.ह. विनोद पाटील, दिनेश ढेणे, पो.ना.गंगाराम डुमणे व इतर पोलिस कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. सुकेळी येथील जिंदाल कंपनीच्या अग्निशामक दलाला प्रथम पाचारण केल्यानंतर नंतर क्षणार्धात आमडोशी येथील सुप्रिम पेट्रोकेम, नागोठणे रिलायन्स तसेच धाटाव एमआयडीसी यांच्या अग्निशामक दलाच्या गाड्या कर्मचाऱ्यांसह दाखल झाल्या. चारही कंपनीच्या अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी ४ ते ५ तासांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण आणण्यात यश मिळवले.


### जाहीर सूचना

याद्वारे जनतेला जाहीरपणे सूचना देण्यात येत आहे की श्री. मुसरत ए. शेख आणि सुलतान अबरार अहमद शेख खोली क्रमांक ०६, पंचवटी सीएचएस प्लॉट क्र. बी/३, सेक्टर १५ कळंबोली नवी मुंबई ४१०२१८ क्षेत्र (३२ चौ.मीटर) श्री पुंडलिक कृष्ण कदम यांच्याकडून खरेदी करू इच्छित आहेत.

ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांचा कालावधीत मूळ मालक कराराच्या वरील उल्लेख केलेल्या जागेशी संबंधित कोणत्याही स्वरूपाचा कोणताही हक्क, हक्क, शीर्षक किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ताबडतोब इच्छुक खरेदीदार सौ. मुसरत ए. शेख आणि श्री. सुलतान अबरार अहमद शेख यांच्याशी संपर्क साधावा.

त्यानंतर श्री. मुसरत ए. शेख आणि सुलतान अबरार अहमद शेख यांना श्री पुंडलिक कृष्ण कदम यांच्यासोबत वरील जागेची विक्री प्रक्रिया पूर्ण करण्याचा अधिकार असेल.त्यानंतर कोणत्याही व्यक्तीकडून उद्भवलेल्या कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही दावे किंवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

**सही/-**
**मुसरत ए.शेख**
**सुलतान अबरार अहमद शेख**
**९०७६४५९२००**
**७०२१०६२४५२**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सदरहू मिळकत १) रफिक आदमजी शेख, २) रशिदा इस्माईल शेख ३) मोहम्मद अमिन इब्राहीम शेख ४) तसलीमा इब्राहीम शेख ५) असलम इब्राहीम शेख ६) नसिमा शब्बीर शेख ७) नाजिया अब्दुलमजीद शेख ८) रियान जावेद शेख ९) आसमा गुलाम रसुल शेख यांचे मालकीची, वहिवाटीची व ताबेकब्जातील, शेतजमीन मिळकत मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ९६ | १ अ | ०-६०-०० पो.ख. ०-०१-५० एकूण ०-६१-५० (यापैकी ०-२७-० हे.आर.पॉ. खरेदीखताचा विषय आहे.) | १२.०० |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वरील मिळकत आमचे अशिल यांनी कायम फरोक्त खताने विकत घ्यावयाची ठरविली आहे. सदरहू मिळकत ही १) रफिक आदमजी शेख, २) रशिदा इस्माईल शेख ३) मोहम्मद अमिन इब्राहीम शेख ४) तसलीमा इब्राहीम शेख ५) असलम इब्राहीम शेख ६) नसिमा शब्बीर शेख ७) नाजिया अब्दुलमजीद शेख ८) रियान जावेद शेख ९) आसमा गुलाम रसुल शेख यांचे मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील असून महसूल दप्तरी सातबारा सदरी त्यांची नावे लागलेली आहेत. वरील सदरहू मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. व तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहीत धरण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.२५/११/२०२१

**सही/-**
**ॲड.दिनेश दत्तात्रेय पाटील**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,**
**गावदेवी मंदिरा समोर, राम गणेश गडकरी मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

Adv. K. P. SAYED
Advocate

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) PANVEL
AT PANVEL

Civil Misc. Application No.1217 of 2021
Exh No : 8/D
Next Date : 8/12/21

Mr. Tausif Salim Khan
Age 32 years, Occupation-Service
Indian Inhabitant, residing at
Plot No.25, Line-E, Room No.4,
Shivaji Nagar Govandi,
Mumbai 400043 ...Applicant

Versus

1. Mrs. Sajarunnisa Saleem Khan
Age 55 years, Occupation- Housewife
2. Mr. Khan Izhar S/o Salim Khan
Age 34 years, Occupation-Service
Opponent No.1 & 2 are residing at
Plot No.25, Line-E, Room No.4,
Shivaji Nagar, Govandi, Mumbai 400043
3. Mrs. Mehrunnisa Harish Khan
Age 37 years, Occupation- Housewife
Residing at- Chawl No.3, Room No. 11
Vinoba Bhave Nagar, Kurla West,
Mumbai 400070. ...Opponents

Whereas the above named Applicant has flied an application for Heirship Certificate in respect of property mentioned in schedule hereunder written which stands in the name of deceased late Mr.Mohammed Salim Mohammed Abbas Khan. Deceased Mr. Mohammed Salim Mohammed Abbas Khan died on 19/02/2013 at Plot No.25, Line No.4, Shivaji Nagar, Room No.4, Shivaji Nagar, Govandi, Mumbai 400043 leaving behind the aforesaid Applicant and opponents as legal heirs.

If anyone has any right, share, claim in the above said property should appear in person or through their advocates within 30 days from the date of publication of this notice, if no one appear and object the application, this court will proceed to pass the necessary orders.

**SCHEDULE OF PROPERTY**

Name of deceased: Mr. Mohammed Salim Mohammed Abbas Khan

Property left by the deceased ;

Flat No.301, A-wing, on the 3 rd Floor, Panchnand Heights, Plot No.15, 17 & 18, Sector-9, Taloja Panchnand, Navi Mumbai, Tal-Panvel, Dist. Raigad, admeasuring 36.790 Sq. Mtrs. Built-up area + 6.460 Sq. Mtrs. Terrace GIVEN UNDER MY HAND AND SEAL OF THE COURT

On this 24 day of November 2021.

Sd/- Jr.Cleark S.D.Court Panvel | Court Seal | Sd/- Assit.Superitent. S.D.Court Panvel



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

## आराध्य पाटीलने केले ७ वर्षात १४ किल्ले सर

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील पागोटे येथील रहिवाशी शिवभक्त कु.आराध्य विवेक पाटील हा फाऊंडेशन जे एन पी टीच्या स्कुलमध्ये इयत्ता इयता २ री मध्ये शिकत असून आराध्यला लहानपणापासून त्याचे वडील विवेक चंद्रकांत पाटील हे त्याला छत्रपती शिवरायांच्या गोष्टी सांगत असत व मराठ्या मावळ्यांचे शौर्य पराक्रम त्यांच्या गोष्टी त्याला सांगत होते आणि ते त्याच्या मनात रुजत गेलं व वयाच्या ४ थ्या वर्षी त्यांनी स्वराज्याची राजधानी रायगड सर केला आणि तिथूनच त्यांला प्रेरणा मिळाली व गड किल्लयांची आवड निर्माण झाली



आत्ता पर्यत ७ वर्षाच्या या वयात त्यांनी १४ किल्ले सर केले आहेत आणि या पुढे ही त्याला छत्रपती शिवरायांच्या इतिहास व मराठ्या मावळांचा इतिहास व गड कोट किल्लयांची माहिती मिळावी या साठी सतत तो उत्साही असतो. आत्तापर्यंत आराध्यने रायगड, कुलाबा, शिवनेरी, प्रतापगड, लोहगड, सिंहगड, सुधागड, द्रोणागिरी, अवचितगड, पद्मदुर्ग, भोरपगड, मर्दनगड, जेजुरीगड, कर्नाळा हे किल्ले सर केले आहेत.

मोबाईल गेम्स व टीव्हीच्या जगात आराध्य मात्र छत्रपती शिवरायांच्या गड कोट किल्लयांचा इतिहास जानण्याचा प्रयत्न करत आहे.आराध्यचे हे शौर्य पाहुन, त्याची शिवभक्ती पाहून त्याच्या या कार्याचे अनेकांनी कौतुक केले आहे.

### पोलादपूर तालुक्यात काटेतळी व लोहारे ग्रामपंचायती वगळता नामनिर्देशन न आल्याने...

# नामाप्र, अजा, अज पदे रिक्तच ठेवण्याची परंपरा; १५ ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणूका

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून मराठाबहुल ग्रामपंचायतींमध्ये असलेल्या म राठाइतर समाजांच्या ग्रामपंचायत सदस्यपदांच्या जागा रिक्त ठेवण्याची अजब परंपरा अस्तित्वात असून संबंधित प्रवर्गाच्या समाजांचे अस्तित्व असूनही कागदपत्रांची जंत्री नाचविण्याकामी सर्वच राजकीय पक्ष अनुत्सूक असल्याने या रिक्त जागांच्या पोटनिवडणुका जाहिर होऊनही प्रतिसाद मिळत नसल्याचे उघडकीस आले आहे. १५ ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणूकांचा कार्यक्रम जाहिर झाला असून यापैकी केवळ काटेतळी आणि लोहारे या ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी राजिनामा दिल्याने पद रिक्त झाले आहे तर अन्य ठिकाणी निवडणुकीपासूनच पदे रिक्त असल्याचे दिसून आले आहे.

पोलादपूर तालुक्यातील कुडपण बुद्रुक येथे २२ डिसेंबर २०१७च्या निवडणुकीपासून नामाप्र महिलेचे पद प्रभाग १ मध्ये रिक्त आहे. या ग्रामपंचायतीची मुदत २१ डिसेंबर २०२२ पर्यंत असूनही गेली चार वर्षे या पदासाठी कोणीही नामनिर्देशन पत्र दाखल केले नाही. यानंतर पांगळोली ग्रामपंचायतीमध्ये २ जुलै २०१८ पासून प्रभाग १ मध्ये नामाप्र आणि प्रभाग ३ मध्ये नामाप्र महिला आणि अनुसुचित जाती अशी दोन पदे रिक्त असून १ जुलै २०२३ पर्यंत ग्रामपंचायतीची मुदत असून तीन सदस्यांविनाच कामकाज सुरू आहे. याच ग्रामपंचायत निवडणुक कार्यक्रमानुसार झालेल्या महाळुंगे ग्रामपंचायतीम ध्ये नामाप्र महिला प्रभाग ३मध्ये आणि महालगूर ग्रामपंचायतीमध्ये प्रभाग २ मध्ये नामाप्र महिला आणि प्रभाग १ मध्ये नामाप्र अशा दोन जागा रिक्त आहेत. पळचिल येथील प्रभाग १ मध्ये नामाप्र, प्रभाग २ मध्ये नामाप्र महिला आणि प्रभाग ३ मध्ये सर्वसाधारण महिला या जागा रिक्त आहेत. आडावळे बुद्रुक येथे प्रभाग ३ मध्ये अनुसुचित जाती महिला आणि प्रभाग १ मध्ये नामाप्र महिला अशी दोन महिलांची पदे रिक्त आहेत. गोवेले येथे अनुसुचित जमाती पद प्रभाग २ मध्ये रिक्त आहे. गोळेगणी ग्रामपंचायतीच्या प्रभाग ३ मध्ये नामाप्र महिला पद रिक्त आहे. बोरघर प्रभाग ३ मध्ये अनुसुचित जमाती पद रिक्त आहे. पैठण प्रभाग २ मध्ये अनुसुचित जमाती स्त्री पद तर उमरठ ग्रामपंचायतीमध्ये प्रभाग १ मध्ये नामाप्र तर प्रभाग ३ मध्ये अनुसुचित जमाती आणि नामाप्र महिला अशी दोन पदे रिक्त आहेत. ओंबळी ग्रामपंचायतीच्या प्रभाग ३ मध्ये नामाप्र महिला पद रिक्त आहे. देवपूर ग्रामपंचायतीच्या प्रभाग ३ मध्ये अनुसुचित जमाती महिला आणि नामाप्र महिला अशी दोन महिला पदे रिक्त आहेत.

पोलादपूर तालुक्यातील काटेतळी ग्रामपंचायतीमध्ये राजिनामा दिल्याने प्रभाग ३ मध्ये सर्वसाधारण पद रिक्त आहे तर बहुचर्चित लोहारे ग्रामपंचायतीमध्ये प्रभाग १ मध्ये शाळा समिती सभापती असलेल्या सदस्यांनी राजिनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदासाठी निवडणुक घेतली जाणार आहे.

या पोटनिवडणुकीमध्ये एकूण १० नामाप्र महिला, ४ नामाप्र, सर्वसाधारण २, सर्वसाधारण महिला १, अनुसुचित जमाती ३, अनुसुचित जमाती महिला २, अनुसुचित जाती १, अनुसुचित जाती महिला १ अशा २४ रिक्त पदांसाठी नामनिर्देशन पत्रे सादर करण्यासाठी ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२१ पर्यंत मुदत असून आवश्यक असल्यास २१ डिसेंबर २०२१ रोजी मतदान प्रक्रिया घेण्यात येणार आहे. पोलादपूर तालुक्यात कोणत्याही राजकीय पक्षांना नामाप्र आणि अजा अज उमेदवारांच्या जातीचे आणि जातपडताळणीचे काम करण्याची इच्छा नसल्याने या जागा निवडणुक प्रक्रिया जाहिर झाल्यापासूनच रिक्त राहात असल्याचे दिसून येत आहे. सर्वसाधारण प्रवर्गामध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्याची चुरस सर्वत्र दिसून येत असताना या मागास प्रवर्गासह अविकासित लोकसंख्येला आरक्षण मिळूनही ग्रामपंचायतीच्या कामकाजापासून वंचित राहावे लागत असल्यामागे या समाजाच्या उमेदवारांची जातविषयक कागदपत्रे तयार करण्याची प्रक्रिया क्लिष्ट असल्याचे महत्वपूर्ण कारण दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यात प्रगत समाजाकडून विविध राजकीय पक्षांचे नेतृत्व केले जात असताना मागास आणि अविकसित समाजाला सोबत घेऊन जाण्याची मानसिकता कोणत्याही राजकीय पक्षामध्ये दिसून येत नाही. काही ठिकाणी प्रगत समाजाने नामाप्र अथवा अनुसुचित जमाती प्रवर्गाला थेट सरपंच पदासाठी वंचित ठेवण्यासाठी अर्जदेखील सादर करण्यास मज्जाव केल्याचे दिसून आले आहे तर काही ठिकाणी प्रगत समाजाप्रमाणेच मागास समाजानेदेखील महिलांना कुठे राजकारणात उतरवायचे असते का? अशी मानसिकता बाळगून सदरची पदे रिक्त ठेवल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या १५ ग्रामपंचायतीमध्ये २४ रिक्त पदांपैकी एक–दोन पदे वगळता अन्य सर्व पदे रिक्त राहण्याचीच दाट शक्यता दिसून येत आहे.

## खालापूर तालुक्यातील ग्यबाणशाहबाबांचा उर्स - मुस्लिम बांधवांनी केला साजरा

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यातील हाळ गावातील जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग लगत कब्रिस्तान येथे असलेल्या 'ग्यबाणशाह पीर ' बाबांच्या उर्स हाळमधील मुस्लीम बांधवांनी साजरा केला. गेल्या अनेक पिढ्यांपासून हाळ गावं मध्ये हा उर्स भक्तीभावाने साजरा केला जात आहे.

'ग्यबाणशाह पीर' बाबांचा उर्स परिसरातील सर्व भाविक एकत्र येवून साजरा करतात. उर्ससाच्या एक दिवस आधी हाळ येथील मुस्लिम भाविकांनी कबरीला गुस्ल अर्पण करून रात्री कुराण पठण, ग्यारवी शरीफ सादर केली. त्यांनतर रातीब करण्यात आला. उर्ससाच्या दिवशी संदल गिलाफ फुलांची चादर, कुलाबांची फुलं मोठ्या प्रमाणात अर्पण करण्यात आले. सर्व धार्मिक विधींसाठी मुस्लिम बांधव, मौलवी यांची उपस्थिती होती.बाबांच्या दर्गेवर अनेक धार्मिक लोकं आपली हाजी लावण्या (दर्शन) साठी तसेच आपले संकट दुरहोण्या साठी विविध मन्नती केल्या जातात व त्या पूर्ण होतात अशी आभावना ठेवून दरवर्षी उर्सला भाविकांची हाजरी असते .ऊर्ससाचा सर्व खर्च मुजावर व हाळ गावातील ग्रामस्थ यांनी श्रध्देने करून भाविकांसाठी लन्गर (जेवण ) मिठी नियाज वाटप करण्यात आले.

## पर्यावरण जनजागृतीसाठी उरण ते गोवा सायकल प्रवास

**दै.रायगड नगरी । उरण**

प्लास्टिकच्या जास्त वापरामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.त्यामुळे प्लास्टिक वापरण्यात बंदी करावी या मुख्य विषयावर जनजागृती करण्याकरिता उरण ते गोवा असा ६५० किलोमीटरचा सायकल प्रवास उरण येथील विवेक घरत आणि रोहा येथील सूरज खांडेकर या दोन तरुणांनी केला आहे.प्रदूषण ही समस्या मोठी गंभीर बनली आहे.

हवेतील प्रदूषण समुद्रातील प्रदूषण प्लास्टिक मुले समुद्रात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊ लागले आहे.समुद्रातील विविध जीवांना त्याचा त्रास होऊ लागला आहे.अनेक प्रजाती नष्ट होऊ लागल्या आहेत. त्यामुळे या प्लास्टिक बंदीच्या जनजागृती करण्यासाठी विवेक भगत आणि सूरज खांडेकर यांनी ६५० किलोमीटर चा प्रवास सायकल वरून केला आहे.हा प्रवास त्यांनी समुद्र लागत हुन केला आहे. या सायकल प्रवासातून केलेल्या जनजागृतीमुळे त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे.

### पत्रकार संघटना तळा प्रेस क्लब कार्यकारणी जाहीर

## संजय रिकामे यांची तालुका अध्यक्षपदी फेर निवड

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड प्रेस क्लब ही पत्रकारांची शिखर संस्था असुन रायगड जिल्ह्यातील पत्रकारांच्या समस्या मार्गी लावण्या बरोबरच जिल्ह्यातील सामाजिक प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीकोनातुन महत्वाचे काम करत आहे रायगड प्रेस क्लबचे संपूर्ण रायगड जिल्ह्यात जाळे पसरले असून तळा शाखेची कार्यकारणी आज जाहीर करण्यात आली.



तळा प्रेस क्लबचे मार्गदर्शक आणि जेष्ठ पत्रकार पुरुषोत्तम मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तळा प्रेस क्लबची बैठक पार पडली यावेळी मुळे यांनी सर्वानुमते तळा प्रेस क्लब कार्यकारणी जाहीर केली यावेळी प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्य संपादक अधक्ष्य डी.टी. अंबेगावे उपस्थित होते. अंबेगावे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की संघटन म्हणजे मी नव्हे आपण सर्व म्हणजे संघटन असे प्रतिपादन करीत पत्रकार समस्या सोडविण्याकरिता सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तरायगड प्रेस क्लबचा वार्षिक कार्यक्रम माणगाव येथे होणार असून त्याबाबत पत्रकार किशोर पितळे यांनी माहिती दिली.

तळा प्रेस क्लब कार्यकारणी मध्ये पत्रकार संजय रिकामे यांची तालुका अध्यक्ष पदी फेरनिवड करण्यात आली उपाधक्ष्य पदी किशोर पितळे सचिव पदी देवयानी सालेकर, खजिनदार पदी नजीर पठाण तर सदस्य म्हणून पुरुषोत्तम मुळे, डी. टी. आंबेगावे ,विराज टिळक अशी कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे.

## तहसीलदार समीर घारे पालकमंत्र्यांकडून सन्मानित



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

ग्रामविकास मंडळ, महिला मंडळ, आणि जाकमाता देवी क्रिकेट संघ गडदाव यांच्या संयुक्त विद्यमाने जाकमाता देवी मंदिर जीर्णो द्धार कार्यक्रमाचे आयोजन पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी जि. प. चे कृषी सभापती बबन मनवे, जि. प. सदस्या धनश्री पाटील,राष्ट्रवादी काँग्रेसचे म्हसळा मुंबई अध्यक्ष महेश शिर्के,सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदिप चाचले, माजी सभापती उज्वला सावंत, मधुकर गायकर, सरपंच फारूक हजवाने, उपसभापती शुभांगी पास्टे, कनिष्ठ अभियंता प्रतिक माने, गितंजली हंबीर, मंडळ अधिकारी सलीम शहा, तलाठी जितेंद्र शेळके आदि मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे औचित्य साधून पालक मंत्र्यांच्या हस्ते श्री जाखमाता देवी पालखी मार्ग पेव्हर ब्लॉक रस्ता भूमिपूजन, निवारा शेड भूमिपूजन त्याच्याबरोबर निसर्ग चक्री वादळात, कोविड काळात मदत आणि पुनर्वसन काळात उत्कृष्ठ काम करणाऱ्या शासकीय कर्मचारी, लोकप्रतिनिधी यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी आपल्या मनोगतात बोलताना पालक मंत्र्यांनी सांगितले की खाडीकिनार पॅटीतील ग्रामस्थ अनेक वर्षे विकासापासून वंचित होते परंतू आदरणीय शरद पवार यांच्या आशीर्वादाने आणि खास. सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मला मंत्रिपदाच्या माध्यमातून तळागातील गोरगरीब जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली असून त्या संधीचे सोने करण्याचे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले. निसर्ग चक्री वादळ आणि कोविड सारख्या महाभयंकर काळात सर्वांनीच योगदान दिले आहे. शासकीय कर्मचाऱ्यांनी तर आपल्या कुटुंब आणि अनेक समस्या असतानाही उत्कृष्ठ प्रकारे जनतेची सेवा केली असल्याने त्यांना सन्मानित करणं हे मी माझे कर्तव्य समजते. तहसीलदात समीर घारे आणि त्यांचे सहकारी यांनी अल्पवाधितच आपली कर्तव्य आणि जबाबदाऱ्या अगदी सहजपणे आणि प्रामाणिक पणे पार पडल्या असल्याचेही आदिती तटकरे यांनी सांगितले.

## सुजाता परदेशी यांनी पटकाविला मणकर्णिका किताब

**दै.रायगड नगरी । खोपोली**

कुसुमवत्सल्य फाउंडेशन आयोजित महाराष्ट्राची सौभाग्यवती २०२१ .पर्व दुसरे फॅशन स्पर्धेत खोपोली येथील सौ. सुजाता सचिन परदेशी यानी पहिला क्रमांक पटकवला असून त्यांची सौभाग्यवती महाराष्ट्राची मनकर्णिका म्हणून निवड करण्यात आली.



महाराष्ट्राचे सौभाग्यवती २०२१ .पर्व दुसरे स्पर्धेचा महाअंतिम सोहळा दापोली येथे आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेत राज्यातील विवाहित सौंदर्यवतींनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. या स्पर्धेत सौंदर्यवतींसाठी स्वागत, परिचय, विंडो वेस्टर्न, संस्कृती आणि प्रश्न उत्तरे अशा फेऱ्या घेण्यात आल्या.नौकरी, व्यवसाय, घर सांभाळणाऱ्या महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, वेगळ्या क्षेत्रात त्यांनी आपले अस्तित्व निर्माण करावे, त्यांच्या स्वप्नांना बळ मिळावे यासाठी या स्पर्धेचे आयोजन संस्थेच्या अध्यक्षा वैशाली पाटील यांनी केले होते.

या स्पर्धेच्या महाअंतिम स्पर्धेत ज्युरी म्हणून रोहित शिंदे, श्रुतिका गाओक्कर, विवेक शर्मा, मेघा जोशी आणि अनामिका ओव्हाळ यांनी काम पाहिले. तर प्रमुख पाहुणे म्हणून अशोक वालम, दिनेश वालम, शरद मोरे, सीमा इंग्रोले, अनिल इंग्रोले, नारायण कुलकर्णी, निशा पाटील, नेहा घुगे, इंदिरा अहिरे, सोनाली सोनार, अभिजित, आशिष जैन, आरती निढाळकर, विद्या कोतवाल, अस्मिता आपटे, अनुजा शित–ळे, आनंद भावे, अरविंद उपस्थीत होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अंजली माने, हर्ष वर्धन पाटील, हिमांशू महाजन, हिमांशू शिंदे यांनी परिश्रम घेतले.सूत्रसंचालन सुरभी हेमंत यांनी केले.

## तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एक २८ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याने ती हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

कळंबोली वसाहतीमधील फायर ब्रिगेड जवळून कु.निरज सावंत (२८) ही बेपत्ता झाली असून तिचा बांधा सडपातळ, उंची ४ फूट ५ इंच, केस काळे लांब, रंग सावळा, नाक लांब, चेहरा गोल, अंगामध्ये ब्लॅक जिन्स व पिंक कलरचा टी–शर्ट व सोबत काळ्या रंगाची पर्स आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक सचिन पवार यांच्याशी संपर्क साधावा.


महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

धारिका क्रमांक : डीआरए–०५२१/प्र.क्र.१९/२०२१/जाहिरात दिनांक : २४ नोव्हेंबर २०२१

आयोगामार्फत खालील संवर्गातील पद भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | एकूण पदसंख्या |
|---|---|---|
| २५६/२०२१ | कनिष्ठ प्रारुपकार, गट–ब | ०३ |
| २५७/२०२१ | सहायक प्रारुपकार–नि–अवर सचिव, गट अ | ०३ |
| २५८/२०२१ | अवर सचिव (विधि), गट–अ | ०३ |

२) प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भात संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, पदांचा प्रवर्गनिहाय तपशिल, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in व http://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.

३) ऑनलाईन अर्ज http://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे दि.२५ नोव्हेंबर २०२१ ते दि.१५ डिसेंबर २०२१ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

४) आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच http://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

ठिकाण : मुंबई सह सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग



मा.श्री.सोनावणे सो.यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६९९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२४/१२/२०२१

१) श्रीमती.विजया शंकर सुतार
वय : ७३ वर्षे, धंदा : वयोवृद्ध
२) श्री.चंद्रकांत शंकर सुतार
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
अर्जदार क्र.१ व २ दोघेही
रा.मु.पो.कोयनावेळे, (घोटकॅम्प), ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.सिद्धी मिलींद सुतार
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.३ रा.वासंती निवास, उथळसर रोड,
ठाणे पश्चिम, टीएमसी शाळा क्र.७ च्या समोर,
ता.जि.ठाणे–४००६०१
४) श्रीमती.मनिषा सुरेश कडवईकर
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.३ रा.कुलस्वामीनी सोसायटी, नं.०१,
रुम नं.१०, दातिवली रोड, एस.एम.जी.शाळे जवळ,
धर्मवीर नगर, मुंब्रा, ता.जि.ठाणे–४००६१२ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. सदर अर्जदार क्र.१ हिचे पती म्हणजेच अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील शंकर लक्ष्मण सुतार हे दि.१२/०२/१९९९ रोजी मु.कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. सदर मयत शंकर लक्ष्मण सुतार यांचे मालकीची मौजे : कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत आहे. सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | गट क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|
| १ | ४१ अ/१६३ | ०–०४.०० |

आता वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत अर्जदारांनी ते मयत शंकर लक्ष्मण सुतार यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२४ माहे नोव्हेंबर सन २०२१ रोजी माझया सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.श्री.सोनावणे सो.यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील
श्री.एन.ए.शेख

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२५६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०१/२०२२

१) श्रीमती.तुलसीदेवी सुरजभान झाझरिया
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.शकुंतला सुरजभान झाझरिया
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्री.रामनिवास सुरजभान झाझरिया
वय : २७ वर्षे, धंदा : व्यवसाय
४) कु.योगिता सुरजभान झाझरिया
वय : २१ वर्षे, धंदा : विद्यार्थी
सर्व रा.फ्लॅट नं.५०१, प्लॉट नं.२० सी,
बिल्डींग नं.८, निल संकुल को.हौ.सोसायटी,
सेक्टर ११, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, कै. सुरजभान अमीलाल झाझरिया हे दि.०३/१०/२०२० रोजी कळंबोली येथे मयत झालेले आहेत त्यांच्या खुद्द मालकीची व ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे : ओवे / खारघर येथे सदनिका आहे. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे

**२) मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सदनिका नं. | इमारतीचे नाव | क्षेत्र | पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | फ्लॅट नं.५०१ पाचवा मजला | निल संकुल को. हौ.सोसायटी, बिल्डींग नं.८ | ६४.१६१ चौ.मीटर बिल्टअप +४.२९७ डेक एरिया | प्लॉट नं.२० सी, सेक्टर–११ कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मयत कै.सुरभजान अमीलाल झाझरिया यांच्या मालकीची होती व आहे. यांच्या मिळकतीबाबत अर्जदार यांना आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता तसेच सदरहू मिळकत अर्जदार यांच्या नावे दाखल करून घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याच्या दृष्टीने व उचित असल्याने अर्जदार यांनी मयताचा वारस दाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जातील जमिनीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्वतः अगर आपल्या वकीलामार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास असे समजण्यात येईल की, वरील मिळकतीबाबत इतर कोणाचाही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे व सदरहू अर्जदार ना.कोर्टाकडून योग्य तो हुकूम घेतील.

आज दि.२४ माहे नोव्हेंबर सन २०२१ रोजी आमच्या सह्या व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## सरकारी हमीभाव भात खरेदी केंद्रात पावती पुस्तकेच मिळत नाही पैशांची हमी कोण घेणार : मारुती वाळंज

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

कोलाड–वरसगाव येथे सरकारी भात खरेदी हमीभाव केंद्र सुरू करण्यात आल्याने शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला आहे.परंतु केंद्रावर भात खरेदी केल्यानंतर शेतकरी वर्गाला देण्यात येणारी पावती पुस्तकेच येथील केंद्रावर उपलब्ध नसल्याने एकप्रकारे येथील केंद्रावर फसलणूकच होत असल्याची परखड प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते मारूती वाळंज यांच्याकडे व्यक्त केली आहे.

या व्यवहारात एकप्रकारे शेतकरी वर्गाची मोठीच फसवणूक होत असून शेतकरी वर्गातून नाराजीही व्यक्त केली जाऊ लागली आहे. तर भात खरेदीघा व्यवहार हा साध्या पावतीवर होत असल्याने शेतकरी वर्गाच्या पैशाची हमी कोण घेणार असाही सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जाऊ लागला आहे.

दिवसेंदिवस वाढत जाणारी महागाई, नैसर्गिक आपत्ती,शेतमालास योग्य भाव न मिळणे यामुळे शेती करणे सध्यातरी शेतकरी वर्गाला परवडत नसल्याने शासन स्तरावर विविध प्रकारच्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत.त्यापैकीच सुरू करण्यात आलेले हमीभाव केंद्र एकप्रकारे शेतकरी वर्गाला दिलासादायक ठरत आहे. परंतू येथील हमीभाव केंद्रावर पावती पुस्तकच मिळत नसल्याने शेतकरी द्विधा मनस्थितीत सापडला आहे. अशा परिस्थितीत शेतकरी वर्गाला शासनाकडून निर्धारित वेळेत पावती पुस्तके मिळवून देऊन शेतकरी वर्गाला दिलासा मिळवून द्यावा अशाप्रकारची मागणी शेतकरी वर्गाकडून होऊ लागली असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

## ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत हे रायगड जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा सविस्तर जिल्हा दौरा खालीलप्रमाणे– गुरुवार दि.२५ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ११.०० वा. मंत्रालय, मुंबई येथून शासकीय वाहनाने पनवेल, जि.रायगडकडे प्रयाण. दुपारी १२.४५ वा. पनवेल येथे सबॉर्डिनेट इंजिनिअर्स, अभियंता भवन येथे कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : अभियंता भवन, प्लाट नं.३ काकाजीनीवाडी रिसॉर्ट जवळ, आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड., दुपारी ३.०० वा. पनवेल येथून शासकीय वाहनाने सह्याद्री अतिथीगृह मलबार हिल, मुंबईकडे प्रयाण.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# नेरळ कळंब रस्ता खड्डेच खड्डे ; मनसे करणार रस्ता रोको आंदोलन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील सर्वाधिक खराब समजला जाणारा रस्ता म्हणून नेरळ– कळंब रस्त्याचे नाव आघाडीवर असते.या रस्त्याची दुरुस्ती आणि नव्याने डांबरीकरण करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे.२५ नोव्हेंबर रोजी मनसेचे कार्यकर्ते नेरळ– कळंब रस्ता रोखणार आहेत.

माथेरान–नेरळ–कळंब या राज्यमार्ग रस्त्यातील नेरळ रेल्वे फाटक ते पोही फाटा या १२ किलोमीटर अंतरावरील रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. चार वर्षपूर्वी या रस्त्यावर चार कोटी रूपयाचा निधी खर्च करण्यात आला होता. मात्र ठेकेदार कंपनीने केलेल्या नित्कृष्ट कामामुळे या रस्त्याची अवस्था दोन वर्षात दयनीय झाली आणि आज या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य असून मागील दोन वर्षांपासून दुचाकी पासून चारचाकी वाहनाना खड्डे चुकवतच प्रवास करावा लागत आहे.या रस्त्याच्या नित्कृष्ट कामाबद्दल उपोषणे करण्यात आली आहेत आणि मुख्यमंत्री पोर्टल वर तक्रारी देखील करण्यात आल्या



आहेत. मात्र ठेकेदारावर कोणतीही कारवाई झालेली नाही आणि दुसरीकडे रस्त्यावरील खड्डे देखील भरले गेले नाहीत. त्यामुळे या रस्त्याबाबत सोशल मीडियावर सातत्याने चर्चा केली जात असताना स्थानिक राजकारणी आणि सत्ताधारी या चर्चेत सहभागी होत नाहीत आणि रस्त्याचे मजबुतीकरण तसेच डांबरीकरण करून घेण्यासाठी आग्रही नाही.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती व्हावी आणि नव्याने डांबरीकरण करण्यात यावे या मागणीसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने अनेकदा निवेदन देऊन आवाज उठविण्याचे काम मनसेकडून सुरु होते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सार्वजनिक बांधकाम विभाग कडून नेरळ–कळंब या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आणि नव्याने डांबरीकरण करण्याच्या मागणीसाठी आक्रमक बनली आहे. निवेदने देऊन देखील सार्वजनिक बांधकाम विभाग कोणत्याही प्रकारची हालचाली करीत नसल्याने मनसे आक्रमक झाली आहे. पक्षाचे तालुका अध्यक्ष बनलेले महेंद्र निगुडकर यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या असहकार भूमिकेमुळे आक्रमक भूमिका घेतली आहे.बांधकाम खात्याच्या विरोधात मनसेने २५ नोव्हेंबर रोजी रस्ता रोको आंदोलन पुकारले आहे. गुरवारी मनसे आणि स्थानिक रिक्षाचालक यांच्या मदतीने या रस्त्यावरील साई मंदिर नाक्यावर रस्ता रोको आंदोलन केले जाणार आहे. त्यावेळी मनसेचे कार्यकर्ते चक्का जाम आंदोलन करणार असून या आंदोलनांत स्थानिक नागरिक,विविध गावातील ग्रामस्थ आणि प्रवासी वाहतूक करणारे वाहनचालक यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मनसेचे कर्जत तालुका अध्यक्ष महेंद्र निगुडकर,तालुका उपाध्यक्ष यशवंत भवारे,अकबर देशमुख यांनी केले आहे.

## उडदवणे येथे ट्रॅक्टर पलटी ; सुदैवाने कोणतीही हानी नाही

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील खांब–पालदाड मार्गावरील उडदवणे गावाजवळील चढावर टँक्टर पलटी झाल्याची घटना घडली आहे. सुदैवाने या अपघातात कोणत्याही प्रकारची हानी झाली नसल्याचे सांगण्यात आले आहे.

सदरची चढण ही अत्यंत धोकादायक असून वाहनचालकांना येथे आपले वाहन चालविताना अंदाज येत नसल्याने आतापर्यंत येथे नेहमीच अपघाताच्या घटना घडल्या आहेत. तर टँक्टर पलटी झाला त्यावेळी येथे कोणतीही रहदारी नसल्याने मोठा अनर्थ टळला आहे. तालुक्यातील मुठवली खु.येथील बांधकाम व्यावसायिक मारूती तुपकर यांचा क्रशने भरलेला टँक्टर धाटावकडून मुठवली येथे जात असताना उडदवणे येथील चढावर आला असता, एकाकी टँक्टर चालकाचा आ–पला टँक्टरवरील ताबा सुटल्याने बघता बघता टँक्टर पलटी होऊन येथील सामाजिक कार्यकर्ते घन:श्याम कराळे यांच्या घराच्या भिंतीवर व दुकानावर आदळला. यामध्ये कराळे यांच्या दुकानाचे व घराचेही नुकसान झाले आहे. या अपघातात कोणतीही रहदारी नसल्याने मोठा अनर्थ टळला आहे.



या अपघाताचे व्रुत्त समजतात विभागातील मोठ्या संख्येने ग्रामस्थ व तरुण यांनी घटनास्थळी धाव घेऊन घडलेल्या अपघाताबाबत मोलाचे सहकार्य केले.

उडदवणे येथील चढावाचा हा रस्ता सर्वांसाठी दिवसेंदिवस धोकादायक बनत असल्याने याबाबत उपाययोजना करण्यासाठी लवकरच या विभागातील ग्रामस्थ तरुणांचे लाडके आ.अनिकेत तटकरे यांची भेट घेणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

## रायगड सुरक्षा मंडळाचे निवड झालेले हजारो सुरक्षा रक्षक नोकरीच्या प्रतिक्षेत

### शासनासह खाजगी आस्थापनांचा मंडळाला ठेंगा?

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड सुरक्षा मंडळाच्या माध्यमातुन सर्वप्रकारची प्रक्रिया पूर्ण करून प्राप्त उमेदवारी अर्जांपैकी ३२०१ सुरक्षा रक्षकांची सुरक्षा मंडळात २६ डिसेंबर २०२० मध्ये निवड केली.२०१९ मध्ये यासंदर्भात मंडळाने भरती प्रक्रिया राबविली होती. मात्र एक वर्षाचा काळावधी लोटुन देखील हजारो मंडळात निवड झालेले सुरक्षा रक्षक अद्यापही नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत.शासनासह खाजगी आस्थापना मंडळाने वेळोवेळी मागणी करून देखील सुरक्षा मंडळाच्या सुरक्षा रक्षकांना सहभागी करून घेण्यास तयार नसल्याचे दिसुन येत आहे.

२०१९ साली रायगड सुरक्षा मंडळाच्या माध्यमातुन भरती प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी सुमारे १०९९८ अर्ज मंडळाला प्राप्त झाले होते. प्राप्त अर्जाच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर ५८६२ जणांची प्रथमदर्शनी निवड प्रक्रियेसाठी निवड झाली. मैदानी आणि शारीरिक चाचणी पूर्ण झाल्यावर ४०५० जण पुढील भरती प्रक्रियेसाठी निवडले गेले. पोलीस पडताळणी तसेच वैद्यकीय तपासणीत अंतिम ३२०१ उमेदवार निवडले गेले.

मात्र यापैकी ४०० ते ५०० सुरक्षा रक्षकांची मंडळात निवड झाली. भरती प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी मंडळाने सेराईज टेक सोल्युशन प्रा ली या कंपनीला काम देण्यात आले होते. या सर्व प्रक्रियेतून पार पडायला सुमारे दोन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला मात्र तरी देखील अद्यापही जवळ पास २५०० पेक्षा जास्त उमेदवार नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत.

एकीकडे कोरोनाकामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराचा प्रश्न निर्माण झालेला असताना शासकीय सुरक्षा मंडळात निवड होऊन देखील अशाप्रकारे हजारो बेरोजगार तरुणांना काम मिळत नसेल तर परिस्थिती भयानक आहे.

कामगार नेते महादेव वाघमारे यांनी माहितीच्या अधिकारात हि धक्कादायक माहिती उघड केली आहे.यासंदर्भात रायगड सुरक्षा मंडळाचे अध्यक्ष समीर चव्हाण यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

> भरतीप्रक्रिया पूर्ण होऊन देखील अशाप्रकारे निवड झालेल्या उमेदवारांची अवहेलना होत असेल तर हे दुर्देवी आहे. सुरक्षा मंडळाने पत्रव्यवहार करून देखील शासकीय अथवा खाजगी आस्थापनाना घेण्यास तयार नसतील तर अशा आस्थापनांवर कारवाईचा प्रस्ताव मंडळाने शासनाकडे पाठविला पाहिजे.लवकरात लवकर हि भरती न झाल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली जाईल .
>
> **-महादेव वाघमारे**
> **(अध्यक्ष, आझाद कामगार संघटना )**

## पनवेल महापालिका क्षेत्रात सार्वजनिक विकासकामांची आर्थिक क्षमतेनुसार लघु निविदा काढण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका अंतर्गत अनेक विकासकामे सुरू असून या सार्वजनिक कामामध्ये अवाढव्य रकमेची एकत्रित निविदा न काढता आर्थिक क्षमतेनुसार लघु निविदा काढण्यात याव्यात, अशी मागणी शिवसेना पनवेल तालुका संघटक भरत पाटील यांनी आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या मंदीच्या काळात सर्वसामान्य नागरिकांना अथवा प्रकल्पग्रस्त ठेकेदारांना शासकीय कामे मिळत नाहीत. सध्या पन–वेल महानगरपालिकेमध्ये सिडको अंतर्गत विभागातील नागरी सुविधा हस्तांतरीत केल्यामुळे ई–टेंडर पद्धतीने साफसफाई, गार्डन, रस्ते, फुटपाथ नुतनीकरण व देखभाल या कामांसाठी मोठ्या रकमेच्या निविदा एकत्रित काढल्या जात आहेत. या कामांच्या निविदा भरण्यास सर्वसामान्य ठेकेदार नाखुश असून स्थानिक प्रकल्पग्रस्तांना कोणत्याही प्रकारचे काम महानगरपालिका क्षेत्रात मिळणे कठीण झाले आहे. या कामांमध्ये खारघर, कळंबोली, कामोठे, तळोजा, नवीन पनवेल भागातील अनेक सेक्टरमधील विकासकामांचे एकत्रित मुल्यांकन करून संपूर्ण मोठ्या रकमेचे टेंडर काढण्यात येते. या एकत्रित कामांच्या निविदेसाठी सर्वसामान्य ठेकेदार पात्र होत नसल्याने सदर एकत्रित कामांच्या निविदेचा फायदा बाहेरचे मोठे ठेकेदार यांना होत असतो. त्यामुळे ई–टेंडर पद्धतीबरोबरच जुन्या कार्यपद्धतीनुसार ऑफलाईन टेंडर पद्धत अंमलात आणल्यास महापालिका क्षेत्रातील निधीचा वापर हा पारदर्शकरित्या होवून स्थानिक प्रकल्पग्रस्त शासनमान्यता प्राप्त ठेकेदारांना याचा उपयोग होवू शकतो, अशी मागणी आयुक्त गणेश देशमुख यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## पाली तहसील कार्यालयाजवळ रस्त्यावर भरकटलेल्या कासवाला पालीतील तरुणांनी दिले जीवदान

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील पाली तहसील कार्यालयाबाहेर रस्त्यावर रात्री काही तरुणांना एक भरकटलेले कासव दिसले. या तरुणांनी ताबडतोब शिवऋण प्रतिष्ठान या व्हॉट्सअप ग्रुपवर ही माहिती कळवली व कासवाला वाचविण्याचे आवाहन केले त्यानंतर पालीतील शंतनू लिमये या प्राणीमित्र युवकाने तेथे जाऊन कासवाला ताब्यात घेतले. त्यानंतर या कासवाला सुरक्षितपणे विहिरीमध्ये सोडले. अशी माहिती शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्रचे उपाध्यक्ष केतन म्हसके यांनी दिली. शिवऋण प्रतिष्ठान नेहमीच सामाजिक व सेवाभावी कार्यात अग्रेसर राहिले आहे, सजीव व जीवसुष्टी टिकली पाहिजे यासाठी पदाधिकारी महत्वपूर्ण काम करतात.



दयानंद माने, अमोल त्रिभुवन व त्यांच्या सहकाऱ्यांना हे कासव दिसले होते. वाहनांच्या धडकेत किंवा इतर प्राण्यांच्या आक्रमणामुळे या कासवाच्या जीवाला धोका होता. त्यामुळे त्यांनी प्रसंगावधानता दाखवून ही माहिती सोशल मीडियावर कळवली. त्यानंतर लागलीच चांगला प्रतिसाद मिळाला व कासवाचे प्राण वाचू शकले.

## माथेरान नगरपरिषदेने रस्त्यातील अडथळे दूर करावेत ; स्थानिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

स्वच्छतेच्या बाबतीत माथेरान नगरपरिषदेने आजपर्यंत उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे अनेकदा स्वच्छता अभियानात पारितोषिक प्राप्त केली आहेत. परंतु ज्या ज्या ठिकाणी रहदारीच्या मार्गावरील पडलेल्या झाडांच्या मोठं मोठया ओंडक्यांना बाजूला केल्यास पादचाऱ्यांना निर्धास्तपणे मार्गक्रमण करता येईल यासाठी नगरपरिषदेने त्याचप्रमाणे संबंधीत वनखात्याच्या अधिकारी वर्गाने, वनसमितीने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

काही ठिकाणी पॉइंटला जाणाऱ्या मार्गावर सुध्दा रस्त्याच्या अगदी जवळ झाडे पडली आहेत. तर महात्मा गांधी मार्गावर रस्त्याच्या कडेला अतिवृष्टी मध्ये पडलेल्या झाडांमुळे रहदारी साठी अडथळा निर्माण होत आहे. याच मार्गावरून दिवसातून अनेकदा रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेसाठी चोवीस तास कार्यरत असते.

सुट्ट्यांच्या हंगामात या भागातून मोठया प्रमाणावर पर्यटकांची वर्दळ त्याचप्रमाणे मालवाहू घोडे, प्रवासी वाहतूक करणारे घोडे, हातरीक्षा आणि पादचाऱ्यांची सततची रेलचेल सूरु असते. त्यामुळे ज्यावेळी विद्युत पुरवठा खंडित होतो त्यावेळी या पडलेल्या झाडांना धक्का लागून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकामी नगरपरिषदेने, वनखात्याने, वनसमितीने यावर ठोस उपाययोजना करावी अशी मागणी सध्या जोर धरू लागली आहे.



# आदर्श युवा संघटना गडब कार्यालयाचे उदघाटन



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील गडब येथील गेली ३२ वर्ष सामाजिक कार्यात अग्रेसर आसणा–या आदर्श युवा संघटना गडब कार्यालयाचे व वाचनालयाचे उदघाटन जेएसडब्लु कंपनीचे जनसंर्पक विभागाचे प्रमुख कॅप्टन राजेश कुमार रॉय यांचे हस्ते करण्यात आले

मुंबई – गोवा महामार्गाचे रुंदीकरणात येथील संघटनेचे कार्यालय तोडण्यात आले होते. जेएसडब्लु कंपणीच्या सीएसआर च्या माध्यमातुन येथील कार्यालय व वाचनालय नव्याने बांधण्यात आले सदर कार्यालचे उदघाटन जेएसडब्लु कंपणीचे जनसंर्पक विभागाचे प्रमुख कॅप्टन राजेश कुमार रॉय यांचे हस्ते करण्यात आले या वेळी जेएसडब्लु कंपणीचे जनसंर्पक विभागाचे नारायण बोलबंडा, आत्माराम बेटकेकर, जेएसडब्लु कंपनीचे सीएसआर विभाग प्रमुख विनायक दळवी, किरण म्हात्रे, सरपंच अर्पणा कोठेकर, उपसरपंच लक्ष्मण कोठेकर,माजी उपसपंच तुलशिदास कोठेकर, विजय पाटील, आदर्श युवा संघटनेचे संचालक के.पी. पाटील, अध्यक्ष काशिनाथ म्हात्रे, कार्याध्यक्ष दिलिप म्हात्रे,सचिव कमलेश ठाकुर, परश–राम मोकल,आदिसह ग्रामपंचायतीचे सदस्य , संघटनेचे सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.

येथील तरुणांसाठी स्पर्धा परिषासाठी जेएसडब्लु कंपणीच्या माध्यमातुन जी मदत लागेल, ज्या सुविधा लागतिल त्या साठी मदत करणार. आपण समाजासाठी काम केले पाहीजे, स्वामी विवेकांनंदाची महती मोठी आहे, त्याचा आदर्श तरुणांनी घेतला पाहीजे. मेहनतीने मोठे व्हा असे जेएसडब्लु कंपणीचे जनसंर्पक विभागाचे प्रमुख कॅप्टन राजेश कुमार रॉय यांनी या वेळी सांगितले. आदर्श युवा संघटनेचे कार्य उल्लेखनिय असुन संघटनेला सर्वोतोपरी सहकार्य करणार असे जेएसडब्लु कंपनीचे जनसंर्पक विभागाचे आत्माराम बेटकेकर यांनी या वेळी सांगितले तर यावेळी विनायक दळवी, के.पी. पाटील काशिनाथ म्हात्रे, संजय चवरकरा आदिनी आपले मनोगत व्यक्त केले.




**नेरेपाडा येथील पत्रकार मयूर तांबडे आणि ऋतुजा झिंजे यांचा शुभविवाह नुकताच संपन्न झाला. यावेळी राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पत्रकार, इतर मान्यवर उपस्थित होते.**